महाराष्ट्र शासन

**शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण**

१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१

Email Id – jdpunescholarship@gmail.com Website – www.jdhepune.info

फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२

जा.क्र. परदेशी शिष्यवृत्ती योजना/शिष्यवृत्ती/२०२३-२४/ 1926 दिनांक : १३.०६.२०२३

**परिपत्रक**

प्रति,

१. प्राचार्य,
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित /विना अनुदानित/
टप्पा अनुदानित/कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा

आवक नं.- 167
दिनांक :- 15/06/23
सही.- Sonawane

२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
३. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.
४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.
५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.
६. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
७. कुलसचिव, श्रीमती नथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई.
८. कुलसचिव, कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक.

**विषय : - उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" या योजनेंतर्गत सन २०२३-२४ करिता विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविणेबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबत...**

संदर्भ : - १. शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक : संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२१८/ताशि-४, दिनांक ४ ऑक्टोबर, २०१८.
२. शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक : संकीर्ण-२०२०/प्र.क्र.११६/ताशि-४, दिनांक ६ सप्टेंबर, २०२१.
३. मा. संचालक, तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. १७/तंशिसं/परदेशी शिष्यवृत्ती/२०२३/१५३ दि. १२ जून, २०२३.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा संदर्भ क्र. १ च्या दि. ४ ऑक्टोबर, २०१८ च्या शासन निर्णयान्वये उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना जाहीर करण्यात आलेली आहे. सदर योजना शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून राबविण्यात आली असून, या योजनेंतर्गत महाराष्ट्र राज्यातील खुल्या प्रवर्गातील जे गुणवंत विद्यार्थी पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका व पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी, THE ( Times Higher Education)/ किंवा QS ( Quacquarelli Symonds) Ranking 200 च्या आतील असलेल्या परदेशातील शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेतला असेल अथवा प्रवेश घेतील, अशा २० विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी परदेशी शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते.

15/06/23

Seen 15/6/2023

संदर्भिय पत्र क्र. ३ च्या अनुषंगाने सदर शिष्यवृत्तीसाठी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता Online पध्दतीने अर्ज मागविण्याची प्रक्रीया संचालनालयाच्या https://dte.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरुन सुरु करण्यात आलेली आहे.

सदर शिष्यवृत्तीसाठी पात्रतेचे निकष खालीलप्रमाणे आहेत.

- उमेदवार व उमेदवाराचे आई / वडील अथवा पालक भारताचे नागरिक तसेच महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असावेत.
- शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये प्रवेश घेतलेल्या तसेच प्रवेश घेण्यास इच्छुक असलेल्या उमेदवारांच्या परदेशातील शैक्षणिक संस्थेचे, अद्ययावत सन २०२२ मधील THE ( Times Higher Education)/ किंवा QS (Quacquarelli Symonds) Ranking 200 च्या आत असणे बंधनकारक आहे.
- उमेदवाराच्या पालकांचे / कुटुंबाचे व उमेदवार नोकरी करीत असल्यास त्याचे स्वतःचे उत्पन्न धरुन सर्व मार्गांनी मिळणारे मागील आर्थिक वर्षातील २०२२-२३ मधील एकत्रित कौटुंबिक उत्पन्न रु. ८ लाखापेक्षा जास्त नसावे.
- या योजनेच्या सविस्तर अटी व शर्ती, पात्रता, वयोमर्यादा, शैक्षणिक अर्जता, मिळणारे लाभ, शिष्यवृत्तीच्या लाभासाठी निवड कार्यपध्दती इत्यादी माहिती करिता तंत्र शिक्षण संचालनालयाच्या https: //foreignscholarship2023.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेला शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण-२०१८ /प्र.क्र.२१८/ताशि-४, दिनांक ४ ऑक्टोबर, २०१८ व शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक संकीर्ण-२०२०/प्र.क्र.११६/ताशि-४, दिनांक ६ सप्टेंबर, २०२१ चा शासन निर्णय तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२१८/ताशि-४, दिनांक ३० ऑक्टोबर, २०१८ व दिनांक ११ फेब्रुवारी, २०१९ ची शासन शुध्दीपत्रके पहावीत त्याअनुषंगाने अर्जांची छाननी करण्यात येईल.

इच्छुक उमेदवारांनी https://foreignscholarship2023.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळावर Online पध्दतीने अर्ज भरण्यासाठीची अंतिम मुदत दिनांक १२ जुलै, २०२३ सायंकाळी ५ वाजेपर्यंत आहे. तसेच Online भरलेल्या अर्जाची प्रत, मूळ प्रमाणपत्रे / कागदपत्रे त्यांच्या साक्षांकित प्रतींसह पडताळणीसाठी सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, पुणे यांच्या कार्यालयात दिनांक १४ जून, २०२३ ते १३ जुलै, २०२३ सायंकाळी ५ वाजेपर्यंत सादर करावयाची आहेत.

सदर योजनेची माहिती विद्यार्थी व पालक यांच्या पर्यंत पोचविण्याच्या दृष्टीकोनातून महाविद्यालय आणि विद्यापीठ स्तरावरुन खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१. सर्व इलेक्ट्रॉनिक्स माध्यमांचा वापर करुन या योजनेस व्यापक प्रसिध्दी द्यावी.

२. विद्यापीठाच्या अधिकृत वेबसाईट, ट्विटर अकाऊंटवरुन सदर योजनेची माहिती व जाहिरात प्रसारित करावी.

३. कॅम्पस रेडिओ, विद्यापीठाचे न्यूज लेटर या दृकश्राव्य माध्यमांचा वापर करुन सदर योजनेची माहिती व जाहिरात यास प्रसिध्दी द्यावी.

सर्व महाविद्यालयांनी प्राचार्यांच्या वॉट्सअॅप गृप तसेच माजी विद्यार्थी संघटनेच्या वॉटसअॅप गृप वरुन सदर योजनेची माहिती व जाहिरात प्रसारित करण्याबाबत संबंधितांना आपल्या स्तरावरुन सूचना देण्यात याव्यात.

सर्व समाजमाध्यमांकडून सोशल मिडिया वर प्रचंड वापरात येत असलेल्या फेसबुक, इन्स्टाग्राम, यु टयूब इ . माध्यमांचा सुध्दा वापर करावा.

सदर योजनेची माहिती विद्यार्थी व पालक यांच्यापर्यंत पोचविण्याच्या दृष्टीकोनातून आपल्या विद्यापीठाच्या अधिपत्याखालील सर्व महाविद्यालयांना परिपत्रकाद्वारे कळवून सदर योजनेस व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी.

(डॉ. किरणकुमार बोंदर)
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे

त - १. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१ यांना माहितीस्तव सादर.

२. डॉ. अभय वाघ, तंत्रशिक्षण संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, ३ महापालिका मार्ग, मुंबई ४००००१. यांना माहितीस्तव सादर.